देवेंद्र फडणवीस नागपूरचे, त्यांना मुंबईचे प्रश्न कुठे कळतात? >>पान 2

भगवा आमच्या रक्तात, सुजय विखे पाटील यांचा निवडणूक आयोगावर प्रहार >>पान 3

सैलानी बाबा यात्रेच्या तयारीला वेग >>पान 4

**सुविचार**

अपयश हेच दर्शविते की आणखी साधनेची आवश्यकता आहे. – राहूल सांकृत्यायन


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 154 ■ शुक्रवार, दि. 09 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



शिल्पा शिंदे दिसणार भाभीजी घर पर हैं २.० मध्ये दुहेरी भूमिकेत...

## राज्यातील २९ महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील




केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याणडोंबिवली, भिवंडीनिजामपूर, मीराभाईंदर, वसईविरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरीचिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगलीमिरजकुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेडवाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## व्रतस्थ पर्यावरण शास्त्रज्ञाला मुकलो, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना श्रद्धांजली



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पर्यावरण संतुलनाच्या क्षेत्रासाठी आयुष्य वेचणारे डॉ. माधव गाडगीळ व्रतस्थ पर्यावरण शास्त्रज्ज्ञ म्हणून सदैव स्मरणात राहतील, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मभूषण डॉ.माधव गाडगीळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, डॉ. गाडगीळ यांनी पर्यावरणविषयक जाणिव जागृती व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले. पश्चिम घाटांमधील जैवविविधतेबाबतच्या संवेदना जिवंत ठेवणं आणि त्या प्रगल्भ करणे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. डॉ. गाडगीळ यांच्या योगदानाची दखल घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने त्यांना २०२४ मध्ये यूएनईपीच्या 'चॅम्पियन ऑफ द अर्थ'पुरस्काराने सन्मानित केले होते. सहा दशकांच्या वैज्ञानिक कारकिर्दीत त्यांनी अनेक पदे भूषविली. मात्र त्यांनी स्वतला 'जनतेचा वैज्ञानिक'च मानलं. पर्यावरण क्षेत्रातील कार्याने महाराष्ट्र सुपुत्र डॉ. गाडगीळ यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली. या अर्थाने त्यांची पर्यावरण जतन, संवर्धन क्षेत्राला उणीव भासत राहील. त्यांच्या निधनामुळे एका ऋषीतुल्य मार्गदर्शकाला आपण मुकलो असून गाडगीळ कुटुंबीयांवर दुःखाचा आघात झाला आहे. त्यांच्यासह गाडगीळ यांचे चाहते, त्यांचे संशोधक विद्यार्थी यांच्या दुःखात आम्ही सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.

## वडील आईला करायचे मारहाण, मुलाने रागाच्या भरात थेट बापाचा जीव घेतला अन् नंतर...; नंदुरबारमध्ये खळबळ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात घडलेल्या एका थरारक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. आई-वडिलांमधील सततच्या वादातून मुलाने टोकाचं पाऊल उचलत वडिलांची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वडिलांकडून आईला होणारी मारहाण असह्य झाल्याने मुलाने काकाच्या मदतीने वडिलांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत वडिलांचा मृत्यू झाला. त्यानंतर हत्येचा पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह खोल दरीत फेकून देण्यात आला. ही घटना धडगाव तालुक्यातील वेलखेडीच्या खेडीबारपाडा येथे घडली. या प्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

मयत किसन वेस्ता वळवी (वय ३५) हा दारूच्या आहारी गेलेला होता. तो नेहमीच मद्यप्राशन करून घरी येत पत्नीला शिवीगाळ व मारहाण करत असल्याची माहिती समोर आली आहे.

# ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो: तर महापाप करणारा महापौर

## नागपुरातून सीएम देवेंद्र फडणवीसांचे मिश्किल विधान

**नागपूर/प्रतिनिधी: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. नागपूर येथे गेले असताना एका मुलाखतीत त्यांना त्यांच्या नगरसेवकाच्या काळातला किस्सा विचारण्यात आला, यावर फडणवीसांनी एक मजेशीर किस्सा सांगितला. तसेच महापौर आणि नगरसेवकाचा जॉब एकदम टफ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो, असेही फडणवीस यांनी गंमतीने विधान केले.**



देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी २१ व्या वर्षी नगरसेवक झालो. त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत मिरवणुका वगैरे काढल्या आणि पहाटे ४ वाजता मी आमच्या घराच्या हॉलमध्ये झोपलो. आणि सकाळी ७ वाजताच घराची बेल वाजली. मी दरवाजा उघडला आणि समोर एक गृहस्थ उभे होते. मी त्यांना विचारले इतक्या सकाळी सकाळी कसेकाय? त्यावर म्हणाले, माझे गटार चोक झाले आहे म्हणून तक्रार करण्यासाठी तुमच्याकडे आलो. त्या दिवशी आपण काय स्वीकारले आहे हे मला समजले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी गमतीने म्हणतो की, ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो. पण मला असे वाटते की तेव्हाच्या महानगरपालिकेत आणि आताच्या महानगरपालिकेत खूप फरक पडला आहे. तेव्हा नागपूर शहर विकासाची आस बघत होते. मी महापौर झालो तेव्हा नागपूरमध्ये पाण्याच्या आठ टाक्या होत्या, आज १०८ पाण्याच्या टाक्या आहेत. हा नागपूरमधला बदल आहे. आज नागपूर एक आधुनिक शहर म्हणून बघायला मिळत आहे.

आमचा तो काळ होता जेव्हा नगरसेवक फक्त गटर, रस्ता आणि दिवे याचा विचार करायचा. तेव्हा अक्षरशः स्पर्धा लागायची की जो स्टोअर किपर असायचा, ज्याच्याकडे ते सगळे दिवे ठेवलेले असायचे, त्याला पटवून तो दिवा लावण्याचे एक दिव्य होते. आता या सगळ्या गोष्टी कराव्या लागत नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

..तर देवेंद्र फडणवीस नगरसेवक झाले नसते

तेव्हाच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या नसत्या तर देवेंद्र फडणवीस नगरसेवक झाले नसते, यावर बोलताना त्यांनी सांगितले की, हे खरे आहे. मला ज्यावेळी सांगितले की या वॉर्डमधून लढायचे आहे. त्यावेळी मी कोणाला सांगितले नाही की माझे वय झाले नव्हते, माझे वय पूर्ण व्हायचे बाकी होते. पण तेव्हा ती निवडणूक काही कारणांमुळे पुढे ढकलली गेली आणि माझे वय त्या निवडणुकीसाठी भरले, असा किस्सा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितला.

## आता बोंबला; भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी वाटली गुजराती पत्रके, मनसे मैदानात

**नवी मुंबई/प्रतिनिधी :**नवी मुंबई महापालिका निवडणूक २०२६ च्या प्रचारासाठी भाजपा उमेदवारांनी गुजराती भाषेत प्रचार पत्रकं वाटल्यानं मोठी खळबळ उडाली. या प्रकरणावरुन महाराष्ट्र नवनिमर्ाण सेनेच्या नेत्यांनी भाजपावर टीकेची झोड उठवली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्यानं मराठी भाषेला आम्ही राजभाषेचा दर्जा दिला आहे. मग ही गुजराती भाषेत पत्रकं वाटण्याचा प्रकार कोणाच्या लांगूनचालनासाठी चालला आहे, असा सवाल मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी केला.

''नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी नवी मुंबईतं भाजपा तिजोरीवर डोळा ठेवून स्वतंत्र लढण्याच्या तयारीत आहे,'' असं वक्तव्य मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी केलं. त्याच बरोबर त्यांनी शिवसेनेचा उल्लेख गद्दार सेना असा केला. ''भाजपा आणि शिवसेना तिजोरीवर डोळा ठेवून स्वतंत्र लढत आहेत. कुठलंही व्हिजन न घेता, भाजपा आणि शिवसेना दोन पक्ष महापालिकेच्या निवडणुकीत रणांगणात उतरले आहेत. कंत्राटदार आणि त्यातून झालेले नगरसेवक, अधिकाऱ्यांची मिली भगत यामुळे कुठलाही प्रकल्प राबवताना भ्रष्टाचार होतं आहे,'' असंही गजानन काळे यांनी यावेळी सांगितलं.

भाजपा उमेदवारांची गुजराती प्रचार पत्रकं : ''मनसेचा जाहीरनामा राबवताना एक हे तो सेफ है असा उल्लेख करत मराठी माणसाला उबाठा आणि मनसेला मतदान करण्याची कळकळीची विनंती त्यांनी केली. भारतीय जनता पक्ष हा मराठी माणसाची आणि मराठी भाषेची कशाप्रकारे कत्तल करतोय याचे अनेक प्रकार महाराष्ट्रातील विविध शहरात आपण पाहिलेले आहेत. भाजपा उमेदवारांनी कशाप्रकारे गुजराती भाषेत प्रचार पत्रकं वाटली,'' याचा देखील उल्लेख गजानन काळे यांनी केला. ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्यानं बोलत आहेत, मराठी भाषेला आम्ही राजभाषेचा दर्जा दिला आहे. मग हे सगळे गुजरातीत पत्रकं वाटण्याचे प्रकार कोणाच्या लांगूनचालनासाठी चालला आहे,'' असं देखील वक्तव्य काळे यांनी केलं. ''नवी मुंबईची ओळख आगरी कोळ्यांचं शहर असं आहे. इथल्या मराठी माणसाचं शहर अशी आहे. मात्र त्या शहराची ओळख पुसण्याचा प्रकार भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेकडून सुरू आहे.''

## बुलढाण्यात लाडकी बहीण योजेनचा लाभ घेणाऱ्या महिलांना झटका; सरकारची कडक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील गोरगरीब महिलांना आर्थिक पाठबळ मिळाव यासाठी सरकारने लाडकी बहीण योजना लागू केली. या योजनेचा असंख्य बहिणींनी लाभही घेतला आणि सरकारला अनेक शुभाशीर्वादही दिले.



या योजनेचा लाभ फक्त आर्थिक दृष्ट्या कमकुवत महिलांनी घ्यावा असे सरकारचे धोरण होते, परंतु काही ठिकाणी प्रचंड पैसे असलेल्या, अगदी आर्थिक स्थिती उत्तम असलेल्या महिलांनीही पैसे फुकट पैसे मिळत आहेत. म्हणून या योजनेचा लाभ घेतला आणि यामुळे राजुत सर्वत्र खळबळ माजली.

ही बाब सरकारच्या लक्षात येताच अर्ज मागे घेण्यासाठी अनेक आवाहने ही करण्यात आली मात्र कोणीही अर्ज मागे घेतला नाही. शेवटी सरकाराने कठोर कारवाई करत संबंधित महिलांकडून रक्कम वसुली करत कायदेशीर कारवाई हि केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शासनाकडून महिला व बालकल्याण विभागाला विविध विभागांत कार्यरत असलेल्या १९६ कर्मचाऱ्यांची यादी प्राप्त झाली होती. या सर्व कर्मचाऱ्यांच्या पात्रतेची सखोल चौकशी करण्यात आली.चौकशीत १९० कर्मचारी अर्धवेळ स्वरूपात कार्यरत असून त्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे हे कर्मचारी योजनेसाठी पात्र ठरले. मात्र उर्वरित ६ शासकीय कर्मचारी अपात्र असतानाही त्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले.या सहा कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये याप्रमाणे एकूण ९९ हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. लवकरच या प्रकरणात पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शासनाची फसवणूक करून 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणे संबंधित कर्मचाऱ्यांना चांगलेच भोवल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद येंडोले यांनी या संपूर्ण कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे.


## शिवसेना भाजपा वाद भोवला; नवी मुंबईतील या प्रभागाच्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाकडून अंतरिम स्थगिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा मनमानी आणि गैरवापर केल्याचा ठपका ठेवत मुंबई उच्च न्यायालयानं नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील प्रभाग क्र. १७-अ मधील निवडणुकीला स्थगिती दिलीय. याप्रकरणी निवडणूक आयोगाला तातडीनं प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत शुक्रवारी या याचिकेवर पुन्हा सुनावणी घेण्याचं उच्च न्यायालयानं निश्चित केलंय. मात्र याप्रकरणामुळे शिवसेना आणि भाजपातील बेबनाव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलाय.

भाजपा उमेदवार निलेश भोजने यांनी नवी मुंबईतील १७ अ या प्रभागातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र शिवसेनेचे जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांच्या तक्रारीवरून त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला. निलेश भोजने यांच्यावर बेकायदेशीर बांधकाम केल्याचा आरोप असतानाही त्यांचा अर्ज कसा स्वीकारला गेला?, असा सवाल उपस्थित केला होता. याची दखल घेत महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन कायद्याच्या कलम १०(१ड) अंतर्गत भोजनेंचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आलाय. याविरोधात भोजने यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागत याचिका दाखल केलीय.

उच्च न्यायालयाचे काय आहेत निर्देश : या याचिकेवर गुरुवारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. भोजने यांच्यावतीनं ज्येष्ठ वकील नवरोज सिरवई यांनी युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितलं की, "निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा आदेश हा प्रथमदर्शनी बेकायदेशीर असल्यानं तो रद्द करण्यात यावा." मुंबई उच्च न्यायालयानं या याचिकेवर तातडीनं सुनावणी घेण्याचं मान्य करत राज्य निवडणूक आयोग, नवी मुंबई महापालिका आयुक्त, मुख्य निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रभाग क्रमांक १७अ च्या निवडणुकीसंदर्भात तूर्तास कोणतीही कार्यवाही करू नये, असे आदेश जारी करत उद्या शुक्रवारी यावर तातडीची सुनावणी घेण्याचं मान्य केलंय.



## व्हेनेझुएलामध्ये ढवळाढवळ

व्हेनेझुएलामधील खनिज तेलाचे साठे अमेरिकेच्या ताब्यात आले असून, पुढील काहीकाळ अमेरिका व्हेनेझुएलाचा कारभार अमेरिका चालवणार असल्याचे डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित करून संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला. अमेरिकेच्या कारवाईचा रशिया, चीन, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांच्यासह अनेक विकसनशील देशांनी तीव्र निषेध केला. स्पेन आणि फ्रान्सचा अपवाद वगळता, युरोपीय महासंघातील जवळपास सर्व देशांनी मादुरो यांना हटवण्याचे समर्थन करताना आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन केले जावे, अशी भूमिका घेतली. भारतानेही तब्बल सात तासांनी पहिली प्रतिक्रिया देत व्हेनेझुएलामधील भारतीयांना सावधगिरी बाळगण्याची सूचना केली. त्यानंतर आणखी एक प्रतिक्रिया देत आपण परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सांगण्यात आले. व्हेनेझुएला हा दक्षिण आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील एक महत्त्वपूर्ण देश असून, तिथे सौदी अरेबियापेक्षा जास्त मोठे तेलाचे साठे आहेत. २०व्या शतकाच्या सुरुवातीला तिथे खनिज तेलाचे साठे आढळले. अमेरिकन कंपन्यांनी त्यांच्यामध्ये गुंतवणूक केली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका जागतिक महासत्ता झाल्यानंतर तिच्याकडून नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध दक्षिण अमेरिकेचा परसदाराप्रमाणे वापर झाला. त्याविरुद्ध असंतोषाचा भडका उडून ठिकठिकाणी साम्यवादी आणि समाजवादी विचारांचे सरकार स्थापन झाले. त्यांना सोव्हिएत रशिया आणि युबाने मोठ्या प्रमाणावर रसद पुरवली. शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या काळात व्हेनेझुएला अमेरिकेचा मित्र, तसेच महत्त्वाचा तेलपुरवठादार देश होता. पण, कालांतराने तिथे सत्तापरिवर्तन होऊन समाजवादी विचारांच्या सरकारने अमेरिकन तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केले. या काळामध्ये युबाने व्हेनेझुएलाला वैद्यकीय, तांत्रिक, तसेच शैक्षणिक क्षेत्रात सेवा पुरवल्या आणि त्याबदल्यात व्हेनेझुएलाने युबाला तेल पुरवले. शीतयुद्धानंतर परिस्थिती बदलू लागली. पण, १९९९ साली सत्तेवर आलेल्या उगो चावेझ यांच्या सरकारने पुन्हा एकदा समाजवाद आणि अमेरिकाविरोधाला व्हेनेझुएलाच्या परराष्ट्र धोरणाच्या केंद्रस्थानी आणले. त्यांच्यानंतर २०१३ साली अध्यक्ष झालेल्या निकोलस मादुरो यांनी चावेझ यांचेच धोरण पुढे राबवायला सुरुवात केली. या काळात सुमारे ८० लाख लोकांनी व्हेनेझुएला सोडून अन्यत्र स्थलांतर केले. भ्रष्टाचार आणि समाजवादी व्यवस्थेमुळे गुंतवणुकीचा ओघ आटला. 'कोविड-१९'च्या काळात तेलाचे भाव कोसळल्यामुळे व्हेनेझुएला आर्थिक संकटात सापडला. तेव्हा मादुरो यांनी अमेरिकेशी संबंध सुधारण्यास सुरुवात केली असली, तरी परिस्थिती पूर्ववत झाल्यावर त्यांनी पुन्हा एकदा अमेरिकाविरोधाचे धोरण स्वीकारले. दरम्यानच्या काळात अमेरिकेची तेल कंपनी 'शेवरॉन'ने व्हेनेझुएलामध्ये गुंतवणूक केली. पण, ३०० अब्ज बॅरल इतका तेलसाठा असलेल्या व्हेनेझुएलाची उत्पादन क्षमता दिवसाला अवघी दहा लाख बॅरल म्हणजे जगाच्या एकूण पुरवठ्याच्या एक टक्का आहे. २०२४ साली झालेल्या निवडणुकांमध्ये मादुरो यांनी दडपशाहीचा वापर करून विजय प्राप्त केला. त्यांच्याविरुद्ध लोकशाहीच्या मार्गाने लढा देणाऱ्या मारिया मचाडो यांना शांततेसाठीचे 'नोबेल' पारितोषिक देण्यात आले. मादुरोंच्या राजवटीविरोधामध्ये अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांनी कठोर निर्बंध लादले. ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून सातत्याने व्हेनेझुएलाविरुद्ध भूमिका घेतली आहे. त्यांच्या भूमिकेला अनेक छटा आहेत. ट्रम्प यांच्या काही सहकाऱ्यांचे मत आहे की, दक्षिण अमेरिकेतून अमेरिकेत होणाऱ्या अवैध स्थलांतर आणि अमली पदार्थांच्या तस्करीवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी तेथील देशांमध्ये अमेरिकेशी मित्रत्व राखणाऱ्या लोकांना सत्तेवर बसवावे लागेल. निकोलस मादुरोंचे सरकार चीन आणि रशियासोबतच 'हमास', 'हिजबुल्ला' आणि इराणलाही मोठ्या प्रमाणावर मदत करत होते. मादुरो यांचे सरकार अमली पदार्थांच्या तस्करीत गुंतले असले, तरी विविध अंदाजांनुसार अमेरिकेत येणारे केवळ दहा टक्के अमली पदार्थ व्हेनेझुएलामार्गे येतात. अमेरिकेसाठी सगळ्यात मोठी डोकेदुखी 'फेंटेनील'ची असून, त्यासाठी कच्चा माल चीनमधून येतो. मेसिकोमध्ये अवैधरित्या फेंटेनील बनवले जाते. सुरुवातीला अशी अपेक्षा होती की, मादुरोंना हटवल्यानंतर अमेरिकेकडून मारिया मचाडोंना किंवा २०२४ सालच्या निवडणुकीत मादुरोंना आव्हान देणाऱ्या एडमुंडो गोन्झालेसना अध्यक्षपदी नेमण्यात येईल. अध्यक्षांना पळवले, तरी व्यवस्था तीच असल्याने असे करणे व्यवहार्य नव्हते. मादुरोंना पळवल्यानंतर व्हेनेझुएलाच्या सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष डेल्सी रॉडरिगेझना 'हंगामी अध्यक्ष' म्हणून घोषित केले. रॉडरिगेझ यांनी आपल्या भाषणात अमेरिकेवर सडकून टीका करत अजूनही मादुरो हेच व्हेनेझुएलाचे अध्यक्ष असल्याचे ठामपणे सांगितले. पण, ट्रम्प यांच्या वक्तव्यात अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांचे रॉडरिगेझ यांच्याशी बोलणे झाल्याचे आणि त्यात रॉडरिगेझ अमेरिकेला सहकार्य करण्याचे प्रतिपादित करण्यात आले. रॉडरिगेझ यांचा जन्म १९६९ साली झाला असून, त्यांचे वडील होर्गे अंतोनियो रॉडरिगेझ हे लिगा समाजवादी पक्षातर्फे १९७०च्या दशकातील सशस्त्र संघर्षात सहभागी होते. त्यांचे भाऊ होर्गे रॉडरिगेझ हे व्हेनेझुएलाच्या संसदेचे अध्यक्ष आहेत. मादुरोंचे अपहरण होत असताना डेल्सी रॉडरिगेझ रशियामध्ये, तर त्यांचे भाऊ होर्गे हे व्हेनेझुएलाची राजधानी काराकसमध्ये होते. आता अशी चर्चा सुरू झाली आहे की, मादुरोंना हटवण्याच्या कटामध्ये रॉडरिगेझ बंधू-भगिनीचा सहभाग आहे. डेल्सी रॉडरिगेझ यांनी उगो चावेझ, तसेच निकोलस मादुरो यांच्या सरकारमध्ये वरिष्ठ मंत्रिपदे सांभाळली असून, व्हेनेझुएलाची अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असताना त्यांनी राष्ट्रीय खनिज तेल कंपनीच्या व्यवहारांमध्ये शिस्त आणून ती रुळावर आणली. त्यांच्या कार्यक्षमतेने ट्रम्प प्रशासनातील वरिष्ठ लोकांनाही प्रभावित केले. अमेरिका आणि व्हेनेझुएलामधील वादामध्ये तोडगा म्हणून मादुरोंच्या जागी रॉडरिगेझ यांना अध्यक्षपदावर बसवण्याची सूचना कतारने केली होती. असेही कानावर पडते आहे की, रशिया आणि अमेरिका यांच्यातील वाटाघाटींदरम्यान एकदा रशियाकडून असा प्रस्ताव देण्यात आला होता की, अमेरिकेने जर युक्रेनमध्ये ढवळाढवळ केली नाही, तर रशिया व्हेनेझुएलामध्ये ढवळाढवळ करणार नाही. यातील सत्य बाहेर यायला अवकाश असला, तरी एक गोष्ट नक्की आहे; ती म्हणजे व्हेनेझुएलातील उच्चपदस्थांच्या सहभागाशिवाय अमेरिकेला अशी कारवाई करणे शक्य नव्हते. या संघर्षामध्ये भारताकडून घेतलेल्या गुळगुळीत प्रतिक्रियेचा देशातील डाव्या विचारवंतांनी निषेध केला. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी केंद्र सरकारच्या प्रतिक्रियेसाठी न थांबता अमेरिकेवर अत्यंत जळजळीत शब्दांमध्ये टीका केली. पण, भारताची भूमिका पराराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने अलीकडच्या काळात घेतलेल्या भूमिकांशी सुसंगतच आहे. रशियाचा युक्रेनवरील हल्ला असो वा इस्रायलने 'हमास', 'हिजबुल्ला' आणि इराणवर केलेले हल्ले असोत, भारताने टोकाची भूमिका टाळली आहे. भारत ज्या भागात आपला प्रभाव नाही, तेथील प्रश्नांच्या बाबतीत टोकाची भूमिका घेऊन धोरणातील पोकळपणा दाखवणे टाळत आहे. व्हेनेझुएलामध्ये चीनने प्रचंड गुंतवणूक केली असून, ती पाण्यात गेल्यास भारताचा फायदा होणार आहे. व्हेनेझुएलाच्या शेजारी असलेल्या गयाना या देशामध्येही तेलाचे मोठे साठे सापडले असून, तेथे भारतीय वंशाचे अध्यक्ष असल्यामुळे भारताला मोठी संधी आहे.

# देवेंद्र फडणवीस नागपूरचे, त्यांना मुंबईचे प्रश्न कुठे कळतात?

## मूळ मुंबईकरांचा मुद्दा उपस्थित करत राज ठाकरेंचा सवाल

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील बहुतांश सत्ताधारी हे मूळचे मुंबईचे नाहीत. त्यामुळे मुंबईकरांच्या अडचणी आणि भावना त्यांना पूर्णपणे समजत नाहीत, असा थेट आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलाय. मुंबई महानगरपालिकेच्या २०२६ च्या निवडणुकीसाठी मतदानाला काहीच दिवस उरले असताना राज ठाकरे यांनी 'मूळ मुंबईकर' असण्याचा मुद्दा उपस्थित केलाय. दैनिक सामनासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची एकत्रित मुलाखत सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत आणि अभिनेते, दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी घेतलीय. या मुलाखतीचा पहिला भाग आज प्रसिद्ध झालाय. यात मुंबईचा विकास, वाढता भ्रष्टाचार, ५० खोक्यांचा आरोप आणि ठाकरे बंधूंना २० वर्षांनंतर एकत्र येण्याची गरज का वाटली अशा अनेक मुद्द्यांवर उद्धव आणि राज ठाकरे यांनी भाष्य केलंय.

मुंबईचे प्रश्न समजण्यासाठी मूळ मुंबईकर असणं गरजेचं : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील बहुतांश सत्ताधारी हे मूळचे मुंबईचे नाहीत. त्यामुळे मुंबईकरांच्या अडचणी आणि भावना त्यांना पूर्णपणे समजत नाहीत हे सांगताना राज ठाकरे यांनी त्यांचा स्विझर्लंडचा अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''मी एकदा स्विझर्लंडला गेलो होतो. तिकडची हवा शुद्ध आहे. सुंदर निसर्ग आहे. चांगले रस्ते, उत्तम सुविधा सगळं आहे. तेव्हा मला प्रश्न पडला की, इथला विरोधी पक्ष कोणते मुद्दे मांडत असेल? त्यांचेही प्रश्न असतील. पण आपल्याला ते कळत नाहीत. तसंच मुंबईचं आहे. देवेंद्र फडणवीस नागपूरचे आहेत. इतर बरेच राज्यकर्ते हे मुंबई बाहेरचे आहेत. त्यामुळे त्यांना मुंबईचे प्रश्न कळत नाहीत. ते मुंबईची तुलना त्यांच्या जिल्ह्यातील लोडशेडिंग किंवा रस्त्यांच्या प्रश्नांशी करतात.'' मुंबईचे प्रश्न समजण्यासाठी मूळ मुंबईकर असणं गरजेचं आहे, असं ठाकरे म्हणाले.

मुंबईच्या विकासाची खरी सुरुवात गडकरींच्या कार्यकाळातच : एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत या टीकेला देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलंय. ते म्हणाले की, ''गेल्या अनेक वर्षांत मुंबईतील मराठी माणसासाठी नेमकं काय केलं, याचं उत्तर दिलं पाहिजे. मुंबईच्या विकासाची खरी सुरुवात नागपूरचे नितीन गडकरी यांच्या कार्यकाळातच झाली, असा दावाही त्यांनी केलाय. तसेच आम्ही मुंबईत जन्मलो नाही, ही बाब आमचा गुन्हा किंवा दोष नाही, असं स्पष्ट करत फडणवीस यांनी टीकेला प्रत्युत्तर दिलंय.

आज एकत्र नाही आलो तर महाराष्ट्र आम्हाला माफ करणार नाही..! : ठाकरे बंधूंना एकत्र येण्यासाठी महाराष्ट्राला २० वर्ष का वाट पाहावी लागली? या प्रश्नावर राज ठाकरेंनी, आज एकत्र नाही आलो आणि आज एकजुटीने सामना नाही केला तर मला असं वाटतं, महाराष्ट्र आम्हाला माफ करणार नाही, असं म्हटलं. राज ठाकरे म्हणाले, ''काही गोष्टी कशा घडल्या? का घडल्या हे आपण सोडून दिलं पाहिजे. काही गोष्टी का घडतात, कशा घडल्या, काय झालं? हे आज आता सोडून दिलं पाहिजे. महेश मांजरेकरांना दिलेल्या मुलाखतीत मी सांगितलं होतं की, कुठल्याही भांडणापेक्षा आणि वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आज संकट महाराष्ट्रावर आहे, मुंबईवर आहे, महाराष्ट्रातील अनेक शहरांवर आहे. हे संकट काय आहे हे मराठी माणसाला समजलेलं आहे, असंही त्यांनी अधोरेखित केलं.

महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या अस्तित्वाचा विषय : काय प्रकारचं राजकारण महाराष्ट्रात सुरू आहे याची जाणीव त्याला आहे. ही एकच गोष्ट आम्ही एकत्र येण्याचं सर्वात महत्त्वाचं कारण आहे.'' महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या अस्तित्वाचा विषय आहे. या विषयावर अनेक वर्षे मी बोलतोय, उद्धवही बोलतोय. परंतु आज अशा एका वळणावर ही निवडणूक आणि महाराष्ट्र उभा आहे, ज्याला आपण 'अभी नही तो कभी नही' तशी परिस्थिती मुंबईवर, ठाण्यावर येऊन ठेपलेली आहे. आज एकत्र नाही आलो आणि आज एकजुटीने सामना नाही केला तर मला असं वाटतं, महाराष्ट्र आम्हाला माफ नाही करणार!,'' असंही राज ठाकरे म्हणालेत.

महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसानं एकत्र आलं पाहिजे : उद्धव ठाकरे याबाबत बोलताना म्हणाले, आम्ही दोन भाऊ एकत्र आलो हा भावनिक मुद्दा आहे. पण दोन भाऊ एकत्र आले याचा अर्थ महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसानं एकत्र आलं पाहिजे. महाराष्ट्र वाचवायचा असेल तर आपल्याला एकजूट दाखवावीच लागेल. पक्ष, राजकीय मतं वेगळी असतील, पण आपण मराठी आहोत. महाराष्ट्र आपला आहे आणि आपण जर एकमेकांमध्ये वेगळ्या चुली मांडल्या, तर महाराष्ट्र तोडणारे त्यांची पोळी भाजून जातील.

५० खोक्यांसाठी २ हजार कोटी बँकेतून कर्ज काढून नाही आणले..! : मुंबई महापालिकेत तीन लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भाजपाकडून ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केला जातोय. मात्र, जर इतका प्रचंड पैसा होता, तर शिंदे गटात गेलेले आमदार केवळ ५० कोटी रुपयांसाठी पक्ष सोडून का गेले, असा खोचक सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी ठाकरे बंधूंना विचारला. संजय राऊतांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना राज ठाकरे यांनी, या मुद्द्यावर स्पष्टपणे बोलण्याच गरज व्यक्त केली. ''५० खोके, ५० खोके'' असा उल्लेख सतत केला जातो, मात्र लोकांना याचा नेमका अर्थ समजायला हवा. ५० खोके म्हणजे थेट ५० कोटी रुपये. जर ४० आमदार असतील, तर ही रक्कम तब्बल २ हजार कोटी रुपयांपर्यंत जाते. एवढा पैसा नेमका कुठून आला? कसा उभा केला गेला? बँकेतून कर्ज घेतलं नव्हतं ना? मग अशा परिस्थितीत कोणत्या भ्रष्टाचारावर कोण बोलणार, असा थेट सवाल उपस्थित केलाय.

आमचा एकही उमेदवार बिनविरोध का निवडून आला नाही? : भाजपाचे ६० हून अधिक उमेदवार आणि एकनाथ शिंदेंचे काही उमेदवार इतके उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. जर पैशांचा, दबावाचा वापर नाही झाला तर मग शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी शरद पवार यांचा एकही उमेदवार का बिनविरोध निवडून आला नाही? ही विचार करण्यासारखी बाब आहे, असं मत उद्धव ठाकरेंनी मांडलंय. याचबरोबर या मुलाखतीत महेश मांजरेकरांनी मुंबईकर म्हणून काही प्रश्न उपस्थित केले. मुंबईचं वाढतं प्रदूषण, रस्ते, ट्रॅफिकची समस्या हे प्रश्न कधी संपणार आहेत? यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी विविध प्रकल्पांसाठी प्रचंड झाडं कापली जाताहेत. आरेमध्ये कारशेड करण्याला त्यासाठी विरोध केल्याचं त्यांनी म्हटलं. पण सर्व रस्ते एकत्र खोदून ठेवणे, प्रचंड प्रमाणात वृक्षतोड, मँग्रोव्हज नष्ट करणे यामुळे मुंबईचा समतोल बिघडत चालला असल्याचे ते म्हणाले. मुंबईतील मतदारांबद्दल बोलताना मतदारांनी मतदानातून राग व्यक्त करण्याची गरज असल्याचं मत राज ठाकरेंनी मांडलंय. लोकांनी मतदानातून राग व्यक्त करणं गरजेचं आहे. जर तसं झालं नाही तर राजाने मारलं काय आणि पावसानं झोडलं काय? तक्रार कोणाकडे करायची? राज्यात भाजपाची सत्ता आहे. केंद्रात त्यांची सत्ता आहे, जर महापालिकेतही त्यांची सत्ता आली तर हतबल होऊन पाहत राहण्याशिवाय काही पर्याय उरणार नाही, असं सावध आवाहन राज ठाकरे यांनी या मुलाखतीतून केलंय. या मुलाखतीचा दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध केला जाणार आहे. त्यात ठाकरे बंधूंनी कोणते मुद्दे मांडले आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागलंय.

## समाजासमोर भांडण करणारे राजकीय पक्ष एकमेकांना मदत करतात- खरगे समितीला मुदतवाढ मिळाल्यानं कुंभार यांचा संताप

दैनिक आपला विदर्भ

**पुणे /प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात चर्चेत असलेल्या कथित मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी सरकारकडून खारगे समितीकडे चौकशीचे आदेश दिलेल असताना पुन्हा खारगे समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी प्रतिक्रिया देत हा घोटाळा आता चौकशीचा विषय राहिलेला नाही. तर सरकारी अनास्थेचा जिवंत नमुना ठरला असल्याचा आरोप केला.

सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार म्हणाले की, '' अखेर अपेक्षेप्रमाणे घडलं आहे. कथित मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी नेमलेल्या खारगे समितीला मुदत वाढ देण्यात आली आहे. ही समिती म्हणजे एक फार्स आहे. लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी नेमलेली ही समिती तयार केली आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीला शासकीय जमीन विक्रीप्रकरणी नेमलेल्या समितीनं दोषी कोण, फायदा कोणाला, जबाबदार कोण? या बाबींवर उजेड टाकणं अपेक्षित होते. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या समितीतील सदस्यांचीच अशी प्रकरणे थांबवण्याची जबाबदारी होती. आज हेच लोक चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा करत आहेत. कारण त्यांना यातील मुख्य लाभार्थ्याला वाचवायचं आहे. कायद्यापेक्षा आणि कर्तव्य पाळण्यापेक्षा जास्त ते आपलं मुख्य काम आहे, असं ते समजत असावेत. मुख्य लाभार्थी मात्र अजूनही कायद्याच्या आणि चौकशीच्या कक्षेबाहेर आहे. त्यामुळे ही समिती न्यायासाठी आहे, असं समजण्याचं कारण नाही. हा योजनाबद्ध घोटाळ्याचा आणि त्यांच्या संरक्षणाचा प्रकार आहे''.

राजकीय पक्ष एकमेकांना मदत करतात- पुढे सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार म्हणाले, '' शासन गतिमान आणि ई गव्हर्नन्स म्हणून स्वत:चं कौतुक करून घेत आहे. मात्र, अधिकारी हे चुकीवर पांघरुण घालण्याचं काम करतात. समिती ही घोटाळा लपविण्यासाठीची यंत्रणा आहे. काय घडलंय हे सर्वांना माहित आहे. चौकशीपर्यंत पोहोचायचं नाही. राजकीय नेते आणि त्यांचे नातेवाईकांसाठी कायदे वेगळे असल्याचं चित्र आहे. ऐन निवडणुकीच्या काळात अडचण म्हणू नको म्हणून अहवाल आलेला नाही. भविष्यात कोर्टकचेरी करून हा अहवाल टाळण्यात येण्याची शक्यता आहे. अनेक घोटाळे झाले असतील याचा तपास करणं महत्त्वाचं आहे. समाजासमोर भांडण करणारे राजकीय पक्ष एकमेकांना मदत करतात, हे यातून दिसत आहे''.

काय आहे कथित घोटाळ्याचं प्रकरण- मुंढवा भागातील ४० एकर जमीनीच्या गैरव्यवहार प्रकरणात व्यवहारात ६ कोटींचे मुद्रांक शुल्क न भरता शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात पार्थ पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दोन पत्रं लिहिल्याचा दावा माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला होता. तर पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी कोणताही आर्थिक व्यवहार झाला नसल्याचं म्हटलं होतं.

# महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवणारी बातमी! एकनाथ शिंदे संजय राऊतांना भेटले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या राजकारणामध्ये मोठी खळबळ उडवून देणारी एक घटना सध्या समोर आली आहे. जाहीरपणे एकमेकांवर टीका करणारे महाराष्ट्राच्या राजकारणातील दोन चेहरे अचानक एकमेकांसमोर आले. मात्र या दोघांमध्ये नेमकी काय चर्चा झाली हे समोर आलेलं नाही. मात्र दोघे एकमेकांसमोर आल्याचा फोटो मात्र तुफान व्हायरल होतोय. हा फोटो आहे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार तसेच प्रवक्ते संजय राऊत. हा फोटो मुंबईमधील एका कार्यक्रमातील असल्याची माहिती समोर येत आहे.

नेमकी कुठे झाली या दोघांची भेट?

एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमादरम्यान राऊत आणि शिंदेंची प्रत्यक्षात भेट झाली. मुलाखतकार सोबत असतानाच हे दोन्ही नेते एकमेकांसमोर आले. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या बहुतांश आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर पहिल्यांदाच राऊत आणि शिंदे अशाप्रकारे एकमेकांच्या आमने-सामने आल्याचं सांगितलं जात आहे.

सतत खोचक शब्दांमध्ये टीका

शिवसेनेमध्ये उभी फूट पडल्यापासून अनेकदा या दोन्ही नेत्यांनी थेट नाव घेत किंवा अप्रत्यक्षपणे एकमेकांनावर कठोर शब्दांमध्ये टीका केल्याचं पाहायला मिळालं आहे. अनेकदा राऊतांकडून शिंदेंचा 'मिंधे' असा उल्लेख करतात. तर एकनाथ शिंदेंनीही अनेकदा राऊतांचा 'सकाळी नऊचा भोंगा' असा उल्लेख केल्याचे संदर्भ सापडतात. दोघांकडूनही एकमेकांवर अगदी टोकाची टीका केली जात असतानाच हे दोघे जेव्हा प्रत्यक्षात भेटले तेव्हा त्यांच्यात काय बोलणं झालं याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

राज ठाकरेंना भेटले

दरम्यान, आज संजय राऊत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीसाठी शिवतीर्थावर गेले होते. नाशिकच्या सभेसाठी राज ठाकरे आणि संजय राऊत यांच्यात चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. उद्या नाशिकमध्ये ठाकरेंची संयुक्त सभा होणार आहे. नाशिकच्या सभेतून ठाकरे सरकारची पोलखोल करणार आहे. कुंभमेळ्यासाठी तपोवन ते रस्ते, पाणी, प्रदूषण, महापालिकेच्या ठेवी, प्रदूषित गोदा घाट इत्यादीसारखा महत्त्वाच्या



विषयांकडे पुराव्यांसह सभेतून ठाकरे उत्तर देणार आहेत. सोबतच राजकीय चिखलफेक, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी, भ्रष्टाचारावर देखील सभेतून ठाकरे भाष्य करणार असल्याचं सांगितलं जात आहे. या सभेतून ठाकरेंचे प्रचार गाणे प्रदर्शित करणार का? याबाबतही चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

राऊतांनी घेतलेल्या ठाकरे बंधुंच्या संयुक्त मुलाखतीमध्ये राज ठाकरेंनी ४० आमदारांना प्रत्येकी ५० कोटी दिले मग २००० कोटी रुपये आले कुठून असा सवाल उपस्थित केला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# भगवा आमच्या रक्तात, सुजय विखे पाटील यांचा निवडणूक आयोगावर प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** भाजपाच्या प्रचारगीतामधील भगवा या शब्दावर निवडणूक आयोगानं घेतलेल्या आक्षेपानंतर राजकीय वातावरण तापलंय. यावरुन भाजपाचे माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी ठाम आणि आक्रमक भूमिका मांडली. निवडणूक आयोगाचा निर्णय मान्य असल्याचं स्पष्ट करताना त्यांनी ठणकावून सांगितलं, ''भगवा हा केवळ शब्द नाही, तो आमच्या रक्तात आहे. शब्द हटवले म्हणून विचार थांबत नाहीत. आयोगाच्या निर्णयाचा निवडणुकीवर कोणताही परिणाम होणार नाही.''अकोल्यातील अकोट येथे झालेल्या भाजपा - श्ध्श युतीवर सुरू असलेल्या चर्चावर प्रतिक्रिया देताना सुजय विखे भाष्य करताना सुजय विखे यांनी भूमिका स्पष्ट केली. ''हिंदुत्व म्हणजे कुणाला देशाबाहेर हद्दपार करणं नाही. संविधानाचा सन्मान करणाऱ्यांशी आम्हाला कोणतीही अडचण नाही. मात्र, जे सामाजिक शांतता भंग करतात, वारंवार हिंदू धर्माचा अपमान करतात, त्यांच्याविरोधात आमचा लढा आहे,'' असं त्यांनी ठामपणे सांगितलं. नगरपंचायतीत भाजपाचा गटनेता मुस्लिम सम ाजातील असल्याचं उदाहरण देत त्यांनी समावेशकतेचा मुद्दा अधोरेखित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लिखाणासंदर्भात ऑक्सफर्डकडून २० वर्षानंतर मागितलेल्या माफीवर प्रतिक्रिया देताना सुजय विखे म्हणाले, ''महाराजांविषयी अपम ानास्पद विधान महाराष्ट्र कदापि सहन करणार नाही.



महाराज आमचा स्वाभिमान आहेत. त्या स्वाभिमानाचं संरक्षण आम्ही आमच्या पद्धतीनं करू.'' या प्रकरणी सर्वात आधी पक्ष आणि संघटनेनं आवाज उठवल्याचंही त्यांनी ठासून सांगितलं.

शब्दांवर बंदी येऊ शकते, पण विचारांवर नाही - ''शब्दांवर बंदी येऊ शकते, पण विचारांवर नाही. भगवा विचार, संविधानाचा सन्मान आणि सामाजिक शांततेचा ठाम आग्रह यावरच जनता शिक्कामोर्तब करेल,'' असा आत्मविश्वास सुजय विखे यांनी व्यक्त केला.

## रिलस्टार अथर्व सुदामेला मोठा दणका; ५० हजारांचा दंड भरावा लागणार, पीएमपीएलची मोठी कारवाई

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील पीएमपीएल बसमध्ये विनापरवानगी रिल्स प्रकरणामध्ये रिलस्टार अथर्व सुदामेला प्रशासनाने तब्बल ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड जमा न केल्यास माहिती तंत्रज्ञान कायद्यानंतर्गत गुन्हा दाखल करणार असल्याची नोटीस प्रशासनाने त्याला पाठवली आहे. पूर्वपरवानगी न घेता, पीएमपीच्या बसमध्ये रील्स तयार करून, त्यामध्ये महामंडळाचा गणवेश, ई-तिकीट मशिन आणि बॅच बिल्ल्याचा बेकायदेशीर वापर केल्याप्रकरणी रील्स स्टार अथर्व सुदामे याला पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) नोटीस बजावली होती.

अथर्व सुदामे याने पीएमपी बसमध्ये वाहकाचा गणवेश परिधान करून, ई-तिकीट मशिन हातात घेऊन रील्स बनवले होते. ते रील त्याने त्याच्या सोशल मि डायवरती शेअर केले होते. संबंधित रील्समध्ये एक महिला आणि एक पुरुष असून, महिलांविषयी आशय असल्याचे नमूद करण्यात आले होते. या रील्समुळे महामंडळाची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोप प्रशासनाने केला होता. संबंधित रील तत्काळ इन्स्टाग्राम वरून हटवावी, तसेच या प्रकरणी सात दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे लेखी खुलासा सादर करण्याची नोटीस त्याला देण्यात आली होती. अन्यथा संबंधिताविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात इशाराही देण्यात आला होता. मात्र आता पीएमपीएलकडून अथर्व सुदामेला ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पुणे महानगर परिवहनमहामंडळाच्या (पीएमपी) बसमध्ये विनापरवानगी चित्रीकरण करून सोशल मीडियावर रील प्रसारित केल्याप्रकरणी अथर्व सुदामेवर पीएमपीकडून ५० हजार रुपयाची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. पीएमपीकडून २ जानेवारीला सुदामेला नोटीसबजावण्यात आली होती. यात सात दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र मुदतीत खुलासा न दिल्याने महामंडळाने त्याच्यावर दंडात्मक कारवाईचा निर्णय घेतला आहे. तसेच गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.दरम्यान अथर्व सुदामेने अजूनही ते रील इंस्टग्रामवरून काढलेले नाही. तसेच ७ दिवसांमध्ये लेखी खुलासाही प्रशासनाकडे सादर केलेला नाही. अखेर पीएमपी प्रशासनाने सुदामेला ५० हजारांचा दंड ठोठावला आहे. तसेच दंड जमा न केल्यास माहिती तंत्रज्ञान कायद्यानंतर्गत गुन्हा दाखल करणार असल्याची नोटीसही त्याला पाठवली आहे.

## शिल्पा शिंदे दिसणार भाभीजी घर पर हैं २.0मध्ये दुहेरी भूमिकेत...

**मुंबई/प्रतिनिधी :** भाभीजी घर पर हैं २.० या शोमध्ये जुनी अंगुरीची एन्ट्री झाल्यानंतर शोमध्ये एक वेगळेपणा दिसत आहे. यावेळी या शोमध्ये भयानकतेचा स्पर्शही जोडण्यात आला आहे. नवीन सीझनमध्ये विभूती नारायण मिश्रा, अनिता भाभी, तिवारी आणि अंगुरी भाभी यांच्या आयुष्यात अचानक विचित्र आणि भयावह घटना घडू लागतात. घर, रस्ता आणि संपूर्ण घुंगटगंजचं वातावरण अचानक भीतीदायक आणि रहस्यमय बनते. कधीकधी अचानक आवाज येतात, कधीकधी विचित्र कृती या शोमध्ये पाहायला मिळते. या सर्वांमध्ये विनोदाचा स्पर्श कथेला जोडला गेला आहे, त्यामुळं प्रेक्षकांचे खूप मनोरंजन होत आहे. आता पुन्हा एकदा या शोमध्ये वेगळे वळण येणार आहे. शिल्पा शिंदे या शोमध्ये काहीतरी विशेष करणार आहे.

शिल्पा शिंदेचा नवीन प्रयोग : शिल्पा शिंदे भाभीजी घर पर हैं २.०मध्ये दुहेरी भूमिका करणार असल्याचं समजत आहे. एकीकडे, ती नेहमीच निष्पाप, भोळी आणि गोड अंगूरी भाभी म्हणून दिसणार आहे, दुसरीकडे, ती विद्या नावाच्या एका रहस्यमय आत्म्याची भूमिका साकारणार आहे. विद्या ही शोमध्ये कहर करणाऱ्या सर्व भूतकाळातील घटनांचे कारण असणार आहे.

## डॉ. माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल राज्यपालांनी व्यक्त केले दुःख



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ यांच्या निधनाचे वृत्त समजून दुःख झाले. पर्यावरण संतुलन, संरक्षण व जैवविविधतेचे जतन या कार्यासाठी आयुष्य वेचलेले डॉ. गाडगीळ हे आधुनिक काळातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. आज जगात पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना त्यांनी सातत्याने विद्यार्थी, युवक तसेच इतर सर्व वर्गांमध्ये पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती केली. त्यांचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशामध्ये म्हटले आहे.

## देशपांडेंना खरंच माध्यमांशी बोलण्यास बंदी?

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सध्या महानगर पालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. राजकीय पक्ष जोमाने प्रचार करत आहेत. यादरम्यान मुंबईतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते आणि म ुंबईचे शहराध्यक्ष संदीप देशपांडे हे नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. यादरम्यान आज पत्रकार परिषद घेत संदीप देशपांडे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. संदीप देशपांडे म्हणाले की, ''कालपासून समाज माध्यमांवर अनेक चर्चा सुरू होत्या की संदीप देशपांडे यांनी मनसे पक्ष सोडला. काहींनी तर अगदी अतिरंजित बातम्या दिल्या. संदीप देशपांडे यांचा भाजपामध्ये प्रवेश देखील झाला अशा बातम्याही मी पहिल्या. या सर्व गोष्टींना पूर्णविराम देणे आवश्यक होते.

## शरद पवार हे भाजपाप्रणीत एनडीएबरोबर जाणार नाहीत, संजय राऊतांचा आशावाद

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीतल्या शिवसेना आणि पक्षात या पक्षांमध्ये होणाऱ्या आवक-जावकवरुन सुरू असलेल्या राजकीय वादावर खासदार संजय राऊत यांनी आज जोरदार टीका केलीय. पत्रकारांनी उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसम धून कोणी ना कोणी भाजपा किंवा शिंदे यांच्या शिवसेनेत जात असल्याच्या मुद्द्यावर प्रश्न विचारताच राऊतांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट लक्ष्य केलं. ''शिंदे यांना फक्त एका दिवसाची बातमी हवी असते. याला फोडलं, त्याला पक्षात घेतलं, अशा बातम्या येतात. पण जे त्या पक्षात जातात, त्यांचं पुढे काय होतं, हे कोणी विचारतं का?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संजय राऊतांनी मुंबईत माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधलाय, त्यावेळी ते बोलत होते. महापालिकेतील वाढत्या बिनविरोध निवडणुकांवरही संजय राऊतांनी परखड भूमिका मांडली. सध्या दबावापोटी हा प्रकार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केलाय. यावेळी त्यांनी एक उदाहरण देत सांगितलं की, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या आई निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या असताना तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला नव्हता. तसेच इंदिरा गांधी, राजीव गांधी, अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील बिनविरोध निवडून आलेले नाहीत, याची आठवण त्यांनी करून दिली. त्यामुळे बिनविरोध निवडणूक म्हणजे ताकद असतेच असे नाही, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला.



शरद पवार एनडीएबरोबर जाऊन स्वत:वर डाग लावून घेणार नाहीत - राऊत : महापालिका निवडणुका झाल्यानंतर शरद पवार हे भाजपप्रणीत एनडीएबरोबर जातील, अशा चर्चांना सध्या उधाण आलंय. या चर्चावर संजय राऊत यांनी शरद पवार या वयात असं काही करतील, असं वाटत नाही. ते एनडीएबरोबर जाणार नाहीत. ते आता असा कोणताही डाग स्वत:वर लावून घेणार नाहीत, असा विश्वास राऊतांनी व्यक्त केलाय.

फडणवीसांना त्यांच्या शब्दातच पकडलं; 'पाप-महापाप'वरून दिला टोला : आज सकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. माध्यम प्रतिनिधींनी फडणवीसांच्या ''जो नगरसेवक होतो, तो पाप केलेला असतो, जो महापौर होतो, तो महापाप केलेला असतो.'' या विधानावर राऊतांनी मिश्कील पण बोचऱ्या शब्दांत उत्तर दिलंय. ''हे वाक्य फडणवीसच म्हणाले, असं म्हणताय ना?'' अशी विचारणा त्यांनी पत्रकारांनाच केली. त्यानंतर त्यांनी थेट फडणवीसांच्या राजकीय प्रवासावर भाष्य करत सांगितलं, ''फडणवीस नगरसेवक होते, म्हणजे त्यांनी मोठं पाप केलं. त्यानंतर महापौर झाले, म्हणजे अजून मोठं पाप. मग आमदार झाले आणि महापाप करून मुख्यमंत्री झाले,'' असा टोला त्यांनी लगावला.

उद्धव-राज ठाकरे मुलाखतीच्या चर्चादरम्यान राऊतांची राजकीय फटकेबाजी : आज सकाळपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संयुक्त मुलाखतीची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. अशा पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार या तिघांचा उल्लेख करत राजकीय घडाम ोडींवर सूचक भाष्य केलं. आज संजय राऊत यांनी विविध मुद्दे उपस्थित करत सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केलाय. शिंदेंना फक्त प्रसिद्धीसाठी फोडाफोडीची गरज असते, असं त्यांनी म्हटल्यानंतर आता शिंदेंची काय प्रतिक्रिया येते हे पाहणं, महत्त्वाचं ठरणार आहे.

## पर्यावरण संरक्षणाला विज्ञानाची, लोकसहभागाची जोड देणारे समर्पित व्यक्तिमत्त्व हरपले - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ.माधव गाडगीळ यांच्या निधनामुळे पर्यावरण संरक्षण चळवळीची मोठी हानी झाली असून पर्यावरण संरक्षणाला विज्ञानाची, लोकसहभागाची जोड देणारे समर्पित व्यक्तिमत्त्व हरपले, या शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत डॉ. गाडगीळ यांना श्रद्धांजली वाहिली आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, विकास आणि पर्यावरण यांचा समतोल कसा साधावा, याचा वस्तुपाठ डॉ. गाडगीळ यांनी घालून दिला होता. निसर्ग हा केवळ पाहण्याची वस्तू नाही, तर तो आपल्या अस्तित्वाचा आधार आहे असे त्यांचे म्हणणे होते. पर्यावरणविषयक सार्वजनिक धोरणांवर त्यांचा मोठा प्रभाव होता. ते शाश्वत विकासाचे खंदे पुरस्कर्ते होते. पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. त्यांनी पारंपरिक ज्ञान प्रणालींना आधुनिक विज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे पर्यावरण संरक्षणात लोकांचा सहभाग घेण्यात त्यांना यश मिळाले. निसर्ग वाचवायचा असेल तर तिथल्या स्थानिक माणसाला सोबत घेतले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. जल, जंगल आणि जमीन यावर स्थानिक लोकांचा अधिकार असावा, असे ते मानत. खाणकाम, मोठी बांधकामे आणि जलवायू बदल यांसारख्या धोक्यांविरुद्ध लढणारा एक प्रमुख आवाज हरवला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. गाडगीळ यांना श्रद्धांजली वाहिली आहे.


## शब्दकोडे क्र. 58

आडवे शब्द

१.जसा राजा तशीच त्याची प्रजा असते या अर्थी एक म्हण ६.संगर,काला १०.नवरा मुलगा ११.शहर १२.पोळया भाजण्याचे साधन १३.शिजवलेली दाळ १५.साम्यता,असमानताच्या विरूध्द १७.कपाळ,ललाट १८.फळातील द्रव १९.'-- पुरता मामा' एक म्हण २०.कागद फाटण्याचा आवाज २१.सावध,दक्ष २२.आण,कसम मराठीत २४.खराब उलटा करा २७.सरळ,तडक २८.बाण,शर २९.हृदय ३०.उपयोग ३२.हिरकणीचा उपयोग ही कापण्यासाठी होतो ३४.कावळयाचा रंग ३५.भार,ओझे ३६.अटीतटीची भाशा ३७.केस काळे करण्याचे साधन ३८.नकली,बनवलेला ३९अ.इंग्रजीत चावी ४०.वडीलांचा भाऊ ४१.दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे ४४.पहाटे आरवणारा प्राणी,कॉक मराठीत ४६.सुगंध,दरवळ ४८.एक लिपी ४९.मासा पकडण्याचा आकडा ५१.शिवाय,म्हैस ५२.भेट,संगम ५३.सापाने टाकलेली त्वचा ५४.हार,सर ५५.भिंतीवर सरपटणारा सरडयाच्या जातीचा एक प्राणी ५६.प्रजा,जन ५७.वासना,इच्छा ६०.घुसणे,प्रवेश करणे ६२.एक फुल झाड ६३.खाली,रिक्त ६४.फटाक्यांची माळ ६५.योग्य,सुरळीत ६६.एक काटेरी फळ ६९.उणीव,ददात ७२.लकाकी,चमक ७३.पवन,वात ७५.मादीचा जोडीदार ७६.थापा मारणारा ७७.चोप,ताडण ७८.सडेतोड,सणसणीत

उभे शब्द

१.वेळ मिळेल तसा,सवडीप्रमाणे २.सिता हरण करणारा राक्षस ३.परस्त्रिशी संग ठेवणारा ४.डामडौल,ऐट ५.माहीतगार,ज्ञात असलेला ६.उन्हाळयातील लिंबु पाणी पेय ७.गोड बोलणारा,भाशण करणारा ८.प्रश्न हिंदीत ९.खरडुन पूसून,भेदभाव न करता १४.लक्ष्मीपती,विस्णु १५.वरचढ,डोईजड १६.नराचा बळी १८.रात्री बाहेर फिरायला निघणारा २३.भितीने होणारा शरीराचा कंप २५.राजकिर्द,सत्तेचा कालावधी २६.एक सरपटणारा प्राणी २९.इच्छा,वासना ३०.स्त्रीया संक्रांतीला हे देतात ३१.धुळकण ३२.ऐन तिन्ही सांजेची वेळ ३३.घराबाहेर न निघुन कुणासोबत ी न मिसळणारा ३८.भिमाने वध केलेला एक खादाड राक्षस ३९.घर,भवन हिंदीत ४१.दुसऱ्यांवर उपकार करणारा ४२.एक विदेशी मदय प्रकार ४३.विकास झालेला,विकसनशील ४५.उपेक्षा करणे,अनादर करणे ४७.हे म्हणजे ते व ते म्हणजे हे ५०.तळे,सरोवर ५४.मालवणी भोशत मला ५५.स्वयंपाक शास्त्र ५८.एकोणचाळीस उभेचे उत्तर पहा ५९.अभंगातील नामदेव महाराज ६१.रडुन सांगीतलेली कथा ६६.मुसलमानी भिक्षुक ६७.एक अधिक पाव ६८.'देवाची --- अन नारळात पाणी' ७०.ग्रामिण स्वप्न ७१.नेहमी रडणारा ७२.खंदक,खाण ७४.रक्षा,राखुंड ७५.बोटाच्या अग्रभागावरील कठीण आवरण



### शब्दकोडे क्र. 57 चे उत्तर

आडवे उत्तर

१.जवळपास ४.गजवदन ८.पाप १०.तारामती १२.यजमान १३.मरगळ १५.समाधान १७.मग १८.तम १९.यंत्रमाग २१.नवा २२.सदाचार २३.सव २४.शहर २५.रयत २८.सर्वत्र २९.प्रयास ३१.मागे हटणे ३३.कोमट ३५.ज्ञात ३६.कळस ३७.नर ३८.म ुद्दाम ३९.नाका ४०.गीत ४२.फटका ४३.लखलखीत ४८.रसातल ५०.दमा ५२.जन ५३.मासा ५५.चल ५६.कमलाकर ५७.महिना ५८.वध ६०.वारुळ ६१.बारदान ६३.धनगर ६५.लगत ६७.मधमाशी ७०.वाळू ७१.आळस ७३.महान ७५.सरणे ७६.घोडनवरा ७९.सल ८०.नात ८१.फारसा ८२.ओळ ८३.समानता

उभे उत्तर


१.जनमत २.पाताळयंत्री ३.सरा ४.गती ५.वर्तमानपत्र ६.नयन ७.दिमाखदार ९.पलंग ११.मलमास १४.रमणीय १६.धावा १७.म रणयातना २०.गवसणे २२.सह २४.शरम २५.रजक २६.तमासगीर २७.दहन २९.प्रज्ञा ३०.सरकारजमा ३२.टरफल ३३.कोमल ३४.टपाल ३८.मुकादम ३९अ.कारनामा ४१.तसाच ४४.खबरबात ४५.खीज ४६.तनमनधन ४७.मामा ४९.तलवार ५१.मालामाल ५४.सावध ५६.कळवळणे ५९.धनवान ६२.दाम ६४.गळू ६६.गरुड ६८.शीतलता ६९.सामना ७१.आरसा ७२.पाव ७४.हात ७५.सर ७६.घोळ ७७.नफा ७८.रास ७९.सन

# सैलानी बाबा यात्रेच्या तयारीला वेग

## २ ते ८ मार्चदरम्यान यात्रा; ४ ते ५ लाख भाविक येण्याची शक्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळगाव सराई येथे होणाऱ्या सैलानी बाबा यात्रा महोत्सवाच्या तयारीला प्रशासनाकडून वेग देण्यात आला आहे. येत्या २ ते ८ मार्च दरम्यान होणाऱ्या या यात्रेसाठी प्रशासनाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक नुकतीच पार पडली. उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत यात्रेदरम्यान लाखो भाविकांसाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा, सुरक्षा



आणि आपत्कालीन व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच सैलानी ट्रस्टचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाच्या अंदाजानुसार देशभरातून चार ते पाच लाख भाविक यात्रेला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कडेकोट पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था, महिला सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना, अग्निशमन यंत्रणा तसेच सुसज्ज आरोग्य कक्ष उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भाविकांना सुरक्षित, सुव्यवस्थित आणि सुविधायुक्त यात्रा अनुभव मिळावा यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असून सर्व विभागांनी समन्वयाने




काम करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली. या वर्षीची सैलानी बाबा यात्रा शांततेत आणि उत्साहात पार पडावी, यासाठी प्रशासन आणि ट्रस्टकडून व्यापक तयारी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## वृत्तविशेष...

### अण्णासाहेब पाटील महामंडळ योजनांतील लाभार्थ्यांना १५ जानेवारीपर्यंत विशेष मुदत

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांचे पात्रता प्रमाणपत्र दि. १ जानेवारी २०२५ पूर्वी निर्माण झाले आहे किंवा ज्या लाभार्थ्यांना बँकेकडून कर्ज मंजुरी प्राप्त झाली आहे, अशा सर्व प्रकरणांसाठी दि. १५ जानेवारी २०२६ पर्यंत पोर्टलवर बँक मंजुरीपत्र अपलोड करण्याची विशेष मुभा देण्यात आली आहे.

या विशेष सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी त्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रश्नावलीस योग्य उत्तरे देणे आवश्यक आहे. प्रश्नावली पूर्ण केल्यानंतरच संबंधित लाभार्थ्यांना बँक मंजुरीपत्र अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सदर सुविधा तात्पुरत्या स्वरूपाची असून, लाभार्थ्यांनी दि. १५ जानेवारी २०२६ पूर्वीच बँक मंजुरीपत्र पोर्टलवर अपलोड करावे, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

### महात्मा बसवेश्वर सामाजिक समता, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक, समाजप्रबोधन व साहित्यिक समाज प्रबोधनकार आणि समाज सेवकांना तसेच सदर समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रतिवर्षी महात्मा बसवेश्वर सामाजिक समता पुरस्कार एक व्यक्ती व एक संस्था यांना देण्यात येतात. यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर पुरस्कार हा विरशैव-लिंगायत समाजाकरीता सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक, समाज संघटनात्मक आध्यात्मिक प्रबोधन व आर्थिकदृष्टया कल्याणासाठी झटणारे नामवंत समाजसेवक, कलावंत समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रबोधनकार व साहित्यीक तसेच सामाजिक संस्था यांना सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी पुरूष वयोमर्यादा किमान ५० वर्ष तर महिला किमान ४० वर्ष असून सामाजिक संस्थेसाठी सदर क्षेत्रातील किमान १० वर्ष कार्य केलेले असल्याचा निकष आहे.

इच्छुक व्यक्ती आणि संस्था यांनी १५ दिवसाच्या आत आपला प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बुलढाणा, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक चिखली रोड बुलढाणा येथे सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

### पुण्यात ऐन निवडणुकीत वडगाव शेरीत दोन गटांमध्ये राडा, सोपाननगरमध्ये दगडफेक, कारवाईची मागणी

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. सोलापूर, अकोल्यातील अकोट, खोपोलीतील इथं झालेल्या हत्यांमुळं निवडणुकीच्या काळातील गुन्हेगारी घटनांबाबत जोरदार चर्चा सुरु आहे. पुण्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात काल रात्री मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचं पाहायला मिळालं आहे. या व्हिडिओत वडगाव शेरीतील सोपाननगरमध्ये दोन गटात राडा दिसून येतो. सोपाननगरमध्ये रस्त्यावर दुचाकी पडलेली दिसून येते. याशिवाय काही तरुण हातात मोठम मोठे दगड घेऊन फेकताना दिसत आहेत. आता या युवकांवर पोलीस काय कारवाई करणार ते पाहावं लागेल.

वडगाव शेरीच्या सोपाननगरमध्ये राडा

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील सोपाननगर परिसरात काल रात्री उशिरा तरुणांच्या दोन गटांमध्ये दगडफेक व मारामारीची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.व्हायरल व्हिडिओमध्ये काही तरुण एकमेकांवर दगडफेक करताना दिसत आहे. त्या व्हिडिओत रस्त्यावर प्रचंड गोंधळाचे दृश्य पाहायला मिळत आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून भयमुक्त व दहशतमुक्त वडगाव शेरीची मागणी जोर धरू लागली आहे.निवडणुकीच्या काळात अशा प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून या घटनेप्रकरणी पोलीस काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु असल्यानं पोलीस प्रशासनावर ताण असल्याचं पाहायला मिळतं. याचवेळी कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लावणाऱ्या घडत असल्याचं पाहायला मिळतंय. पुणे पोलीस आता या व्हिडिओतील तरुणांवर काय कारवाई करणार ते पाहावं लागेल.

काल रात्री ठाण्यातील राबोडी परिसरामध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झाले होते.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे राबोडी परिसरामध्ये आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी गेले असता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष आणि राबोडीचे उमेदवार नजीब मुल्ला यांच्या कार्यकर्त्यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यासमोर घोषणाबाजी देत आव्हाडांना डिवचण्याचा प्रयत्न केला. तर आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांनी नजीब मुल्ला यांच्या विरोधात मोठा प्रमाण घोषणाबाजी केली आहे.

## ज्याचा केला पराभव, त्याचाच करा प्रचार; पक्षाच्या अजब निर्णयामुळे भाजपाच्या माजी नगरसेवकाची गोची

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता तर कुठे युतीमधील जागावाटप असे निकष लावून अनेक भाजपाच्या उमेदवारांची तिकीटे कापण्यात आली आहेत. मात्र, अमरावतीत चक्क काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेल्या उमेदवाराला तिकीट देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे ज्या प्रभागामध्ये भाजपाच्या उमेदवाराकडून पराभव झाला होता, त्या ठिकाणीच पूर्वाश्रमीचा काँग्रेस कार्यकर्ता भाजपाकडून कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार आहे.

अमरावती महापालिका निवडणुकीत भाजपच्या उमेदवारी निवड संदर्भात झालेल्या निर्णयामुळे अनेक ठिकाणी गोंधळ उडालाय. शहरातील आंबापेठ प्रभागात २०१७ च्या निवडणुकीत सुमारे ३ हजार मतांच्या फरकानं विजयी झालेले भाजपाचे माजी नगरसेवक अजय सारसकर यांची यावेळी उमेदवारी कापण्यात आली. विशेष म्हणजे ज्या काँग्रेस उमेदवाराचा त्यांनी मागील निवडणुकीत पराभव केला होता, त्याच उमेदवाराला भाजपानं उमेदवारी दिली. आता आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करा, असे आदेश देऊन भाजपानं अजय सारसकर यांची गोची केल्यानं प्रभागात चर्चांना उधाण आलंय.

माजी नगरसेवकावर अन्याय झाल्याचा सूर- २०१७ मध्ये अंबापेठ गोरक्षण प्रभागात 'अ' गटात अजय सरसकर, 'ब' गटात लविना हर्षे, 'क' गटात स्वाती कुलकर्णी , 'ड' गटात प्रणित सोनी हे भाजपाचे उमेदवार होते. यावेळी अजय सरसकर वगळता मागे निवडून आलेल्या सर्व उमेदवारांना पुन्हा संधी देण्यात आली. विशेष म्हणजे मागील निवडणुकीत अजय सरसकर यांना ६ हजार १६७ मतं मिळाली होती. तर त्यांच्या विरोधात असणारे काँग्रेसमध्ये असताना मिलिंद बांबल यांना ३ हजार ६२० मतं मिळाली होती. काँग्रेसमध्ये पराभव झाल्यावर आता काही वर्षापूर्वी मिलिंद बांबल यांनी भाजपात प्रवेश घेतला. भाजपानं त्यांना उमेदवारी दिली. भाजपाचा हा निर्णय अजय सरसकर यांच्यावर अन्याय करणारा असल्याचा सूर पक्षातूनच उमटतोय.

सांगा प्रचार कसा करू- ''भाजपा माझ्या रक्तात आहे. मी युवा मोर्चाचा अध्यक्ष असताना प्रामाणिक काम केलंय. मात्र, त्या उमेदवाराला मी मागील निवडणुकीत पराभूत केलं. काँग्रेसमध्ये असताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेकदा टीका केली. त्याच उमेदवारासाठी मला काम करावं लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली. विचारधारेत फरक असलेल्या उमेदवाराला सोबत घेऊन प्रचार कसा करायचा? हा मोठा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला आहे'', अशी अजय सरसकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

काही चुका झाल्यात- ''अजय सरसकरसारख्या व्यक्तीची उमेदवारी कापली, अशा काही चुका झाल्यात'', असं पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच म्हटलं. ''प्रामाणिक कार्यकर्त्यांचा योग्य विचार होईल. पक्ष त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही'', असंदेखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

मी भाजपाचाच कार्यकर्ता- ''१९९७ पासून मी भाजपामध्ये आहे. १९९८ मध्ये शारदानगर वॉर्डचा मी भाजपा उपाध्यक्ष होतो. त्यानंतर युवा मोर्चा शहर सचिवाची जबाबदारी माझ्याकडे होती. भाजपा युवा मोर्चाचाही मी अध्यक्ष होतो. बडनेरा विधानसभा भाजपा प्रमुख म्हणून माझी नियुक्ती झाली होती. सलग तीन वेळा मी भाजपा किसान मोर्चा अध्यक्ष म्हणून काम केलंय. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी केलेल्या विविध आंदोलनांत माझ्यावर ६७ गुन्हे दाखल आहेत. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याकरिता १५ मे २००१ रोजी मी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची गाडी अडवली होती. मात्र, मागच्या निवडणुकीत मी काँग्रेसच्या पॅनलमध्ये होतो. काँग्रेसच्या पॅनलमध्ये असताना माझं चिन्ह हाताचा पंजा नव्हतं. त्यामुळे आता मी पक्षाच्या बाहेरचा वगैरे आहे, असा आरोप करणं योग्य नाही'', असं मिलिंद बांबल यांनी स्पष्ट केलंय.

## पोलीस बँडबरोबर गाणं गाताना सोनू निगम झाला भावूक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा सुप्रसिद्ध गायक सोनू निगम यांनी बुधवारी मुंबई पोलीस बँडसह एका कार्यक्रमात आपल्या सुमधूर आवाजात मुंबई पोलिसांना एक अनोखी मानवंदना दिली. येत्या २३ जानेवारीला सर्वत्र प्रदर्शित होणाऱ्या 'बॉर्डर २' या आगामी सिनेमाच्या प्रसिद्धीकरता सोनू निगम गेला होता. त्यावेळी सोनू निगमनं २८ वर्षापूर्वी 'बॉर्डर' या सिनेमात गायलेल्या 'संदेसे आते है' या अजरामर गाण्याशी जोडलेल्या काही आठवणीही सांगितल्या आहेत. मुंबई पोलीस दलाच्या नायगाव संकुलातील सभागृहात बुधवारी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोलीस बँडतर्फे बॉर्डरमधील 'ए जाते हुए लम्हो...' 'हिंदुस्तान...' आणि 'संदेसे आते है...' ही गाणी वाजवण्यात आली. या कार्यक्रमाला सोनू निगमच्या विशेष उपस्थितीमुळं एक वेगळ्याच उंचीवर नेलं. सोनूनेही मग उपस्थितीतांना आपल्या आवाजानं काहीकाळ मंत्रमुग्ध केलं. सोनू निगमनं त्याचं गाणं भारत देशासाठी आपले प्राण समर्पित केलेल्या जवानांना अर्पण केले.

'संदेसे आते है...' हे गाणं आपल्या करिअरला कलाटणी देणारी घटना होती. असं सांगताना यावेळी सोनू निगमनं संगीतकार अन्नू मलिक यांचे विशेष आभार मानले. २८ वर्षापूर्वी एका नवोदित गायकाला हे इतकं मोठ गाणं देऊन त्यांनी माझ करिअर घडवलं असंही सोनूनं आवर्जून सांगितलं. तसेच मुंबई, मुंबईकर आणि मुंबई पोलीस यांचं आपल्या जीवनात फार विशेष स्थान असल्याचंही यावेळी सोनूनं कबूल केलं. त्यामुळं जेव्हा जेव्हा मुंबई पोलीसांबरोबर एखादा मंच शेअर करायची संधी मिळते, तेव्हा तो आपल्यासाठी अभिमानाचा क्षण असतो असंही सोनूनं सांगितलं.

दरम्यान 'बॉर्डर २' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर यामध्ये सनी देओल, वरुण धवन, अहान शेट्टी, दिलजीत दोसांझ, सोनम बाजवा, मेधा राणा, मोना सिंग आणि अन्या सिंग हे स्टार्स दिसणार आहेत. आता अनेकजण या चित्रपटाच्या रिलीजची आतुरतेनं वाट पाहात आहेत. या चित्रपटामधील 'घर कब आओगे' गाणं हे देखील रिलीज केलं गेलं आहे. या गाण्याला प्रेक्षकांनी खूप पसंत केलं आहे. 'घर कब आओगे' गाण्याला सोनू निगम आणि अरिजित सिंग विशाल मिश्रा आणि दिलजीत दोसांझ यांनी गायलं आहे.

## सिकलसेल मुक्तीसाठी १५ जानेवारीपासून विशेष अभियान; ७ फेब्रुवारीपर्यंत जिल्हाभरात तपासणी व जनजागृती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला असून आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार दि. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत ४० वर्षांपर्यंतच्या सर्व नागरिकांची प्राथमिक सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीदरम्यान संशयित रुग्ण व वाहकांची नोंद घेऊन आवश्यकतेनुसार एचपीएलसी किंवा इलेक्ट्रोफोरेसिस या प्रगत तपासण्या केल्या जाणार आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्हा आरोग्य यंत्रणा या विशेष अभियानासाठी सज्ज झाली आहे. जिल्हा व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अशी राहील प्रक्रिया: अभियानादरम्यान ४० वर्षांपर्यंतच्या नागरिकांची प्राथमिक तपासणी करण्यात येईल. संशयित रुग्णांची पुढील सखोल तपासणी करून त्यांना औषधोपचार, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. भावी पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर देण्यात येणार आहे.

अभियान यशस्वी करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती उपक्रम, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच बॅनर, पोस्टर्स, सोशल मीडिया, गृहभेटी यांद्वारे सिकलसेल ॲनिमियाबाबत व्यापक जनजागृती केली जाणार आहे. ग्रामीण भागात महिला मंडळांच्या माध्यमातूनही विशेष जनजागृती उपक्रम राबविले जाणार आहेत. सिकलसेल मुक्त बुलढाणा जिल्हा करण्यासाठी सर्व नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. विशेषतः तरुणांनी तपासणी करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

### एअरपोर्टवर विराटच्या भेटीला जमली विराट गर्दी; चाहत्यांचा घेराव... सोशल मीडियावर व्हिडीओ तुफान व्हायरल

नवी दिल्ली : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे ११ जानेवारीला वडोदरा येथे खेळवला जाणारा आहे. या सामन्यापूर्वीच विराट कोहली वडोदऱ्यात दाखल झालं असून, विमानतळावरून चाहत्यांनी त्याचे जल्लोषात स्वागत केले. आणि स्वागतवेळी एअरपोर्टवर विराटला बघण्यासाठी चाहत्यांची एकच झुंबड उडाली.या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये विराट कोहलीने काळया रंगाचा टी -शर्ट आणि काळा चष्मा घातला होता. चाहत्यांचा उत्साह इतका होता की प्रत्येकजण विराटला भेटण्यासाठी, त्याच्यासोबत फोटो काढण्यासाठी आतुर झाला होता. त्यामुळे हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला.

भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली सध्या शानदार फॉर्ममध्ये आहे. विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेत तो दिल्ली संघाकडून खेळताना दिसला. अवघ्या दोन सामन्यांत विराटने २०८ धावा करत आपली छाप पाडली आहे. आंध्र प्रदेशविरुद्ध त्याने दमदार १३१ धावांची खेळी साकारली, तर गुजरातविरुद्ध ७७ धावा ठोकल्या.


## हरभऱ्यावर घाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापन करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील बहुतांश भागात हरभऱ्याचे पीक फुलोरा अवस्थेत असून या कालावधीत घाटेअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक आहे. घाटेअळी ही हरभऱ्याची प्रमुख कीड असून तिच्यामुळे फुले व घाट्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

घाटेअळीची मादी पतंग पानांवर, कोवळ्या शेंड्यांवर, कळ्यांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. अंड्यातून २ ते ३ दिवसांत अळी बाहेर पडून प्रथम पानावरील हरितद्रव्य खरडून खाते. पुढे अळ्या संपूर्ण पाने, देठे तसेच फुले व घाटे खातात. मोठ्या अळ्या घाट्यांना छिद्र पाडून आतील दाणे खाऊन पाटे पोखरतात. एक अळी साधारणतः ३० ते ४० घाट्यांचे नुकसान करू शकते.

एकात्मिक व्यवस्थापन : १) घाटे अळीचे परभक्षक बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी इत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. २) ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे (प्रती हेक्टर २० पक्षी थांबे ) तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते. ३) घाटे अळीचे कामगंध



सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळ्यामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय राबवावे. (४) शेतकरी बंधुनी आपल्या पिकाचे निरीक्षण करून किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यावर(१ ते २ अळया प्रति मिटर ओळ) आढळून आल्यास किंवा ४० ते ५० टक्के पिक फुलोऱ्यावर आल्यानंतर घाटेअळीचे व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्क ५ टक्के किंवा एच.ए.एन.पि.व्हि (११०१ पिओबी/ मिली) ५०० एल.ई./ हे. किंवा क्विनॉलफॉस २५ ई.सी., २० मि.ली. पिक परिस्थितीनुसार फवारणी करावी.

पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर दुसरी फवारणी ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली, किंवा इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम, किंवा स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली, किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी ३ मिली, किंवा इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली, किंवा लँबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या पंपासाठी असुन, पावरस्प्रे साठी मात्रा तिप्पट करावी. हरभऱ्यांवरील पाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापनासाठी उपाययोजना करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.